चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
०७ जुलै, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# वर्ल्डकपच्या मॅचेसवर जुगार खेळणाऱ्याविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## ०५ आरोपीसह १ लक्ष ८० हजाराचा मुददेमाल हस्तगत

दिनांक ०६/०७/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम फुले चौक गणपती अपार्टमेंट चंद्रपुर येथे वर्ल्डकपच्या मॅचेसवर सटट्ा लावुन जुगारचा खेळ खेळत आहे. अशा खबरेवरून स्थागुशा पथकाने सापळा रचुन घटनास्थळी गणपती अपार्टमेंट येथे छापा टाकला असता एका घरात ०५ इसम मिळुन आले. सदर इसमांची विचारपुस करून झडती घेतली असता सदर इसम हे क्रिकेट मॅचेसवर सटटा लावुन जुगारचा खेळ खेळत आहे असे सष्ट झाल्याने पाचही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. घटनास्थळावरून एक एलईडी टीव्ही, लैपटॉप, १४ मोबाईल फोन, १ मोटारसायकल आणि नगदी रोख असा एकुण १,७०,८००/—रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास स्थागुशा पथक करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. प्रविण मानकर, पोशि रविंद्र पंधरे, पोशि. अमोल धंदरे, चापोशि. प्रितम रामटेके यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————